RNI No. MAHBIL/2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ७, अंक ७] गुरुवार, फेब्रुवारी १८, २०२१/माघ २९, शके १९४२ [पृष्ठे १८, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक १०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

## नगरविकास विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ फेब्रुवारी २०२१.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्र. एमयुएम २०१३/ प्र.क्र. ४७/ नवि -१७.— ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर परिषद, *नगर पंचायती* व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४०) (यात यापुढे ज्यांचा उल्लेख "उक्त अधिनियम"असा करण्यात आला आहे.) च्या कलम ३ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींच्या अधिन राहून, ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ चे पोट-कलम (२), (*२क*) आणि (३) यांच्या तरतुदीनुसार, शासन उद्घोषणा, नगरविकास विभाग, क्र. एमयुएम २०१३/ प्र.क्र. ४७/ नवि -१७, दि. ०४ डिसेंबर, २०२० रोजीच्या **महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र**, यामध्ये उद्घोषणा प्रसिद्ध केली असून, शासनाने नाशिक जिल्ह्यातील ओझर या ग्रामपंचायतीचे स्थानिक क्षेत्र नागरी क्षेत्रामध्ये लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करण्याच्या आणि उक्त स्थानिक क्षेत्रासाठी "ओझर नगरपरिषद" या नावाने नगरपरिषद गठीत करण्याचा हेतू घोषीत केला होता;

आणि ज्याअर्थी, उक्त उद्घोषणेमध्ये नमूद कालावधीत जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे प्राप्त झालेल्या आक्षेप आणि सूचनांचा शासनाने विचार केला आहे ;

आणि ज्याअर्थी, भारताचे संविधानाच्या अनुछेद २४३-थ च्या खंड (२) मध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाला, यासोबत जोडलेल्या अनुसूची 'अ' मध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेले उक्त स्थानिक क्षेत्र हे, लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करणे इष्ट वाटते ;

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाच्या कलम ३ चे पोट-कलम (२), (*२क*) आणि (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून उक्त स्थानिक क्षेत्र हे, लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करीत असून, त्याकरीता उक्त अधिनियमाच्या कलम ३ चे पोट-कलम (२), (*२क*) आणि (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, "ओझर नगरपरिषद" या नावाने नगरपरिषद गठीत करण्यात येईल. उक्त लहान नागरी क्षेत्राच्या हद्दी यासोबत जोडलेल्या अनुसूची 'ब' मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

**अनुसुची - "अ"**

**लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करावयाच्या स्थानिक क्षेत्राचे वर्णन**

ओझर गावठाणातील संपुर्ण महसूली क्षेत्र

गट नं. १ ते २७३१ आणि संपुर्ण बाणगंगानगर गाव गट क्र. १ ते १७६ च्या सीमेसह

**पूर्व** :- ओझर गावाची व बाणगंगानगर गावाची पुर्वेकडील सीमा.

**पश्चिम** :- ओझर गावाची पश्चिमेकडील सीमा.

**दक्षिण** :- ओझर, अमृतनगर व विजयनगर गावाची दक्षिणेकडील सीमा.

**उत्तर** :- ओझर गावाची उत्तरेकडील सीमा.

**अनुसुची - " ब "**

**पूर्व** :- ओझर ता.निफाड जि.नाशिक येथील ग. नं ७०३ चे ईशान्य टोकापासून खाली दक्षिण दिशेकडे गट नंबर ७०२, ७०८, ७०९, ७३३ ते ७३७ पर्यंत उत्तर दक्षिण बांधाने पश्चिम बाजुपर्यंत पुढे मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्र.३ व पालखेड चारी ओलांडुन गट नं ७४२ चे पूर्व हद्दीने एच.ए.एल नागरी वसाहतीचे पुर्वेकडील भिंतीने दक्षिण दिशेकडे मौजे दिक्षी गावाचे पश्चिम हद्दीने गंगापुर कॅनाल ओलांडुन गट नं. ७४३, ७५० ते ७५६, ७६८ ते ७७४, ८०५ ते ८०८, ८१४ ते ८१७, ८२० ते ८२९ पर्यंत उत्तर दक्षिण बांधाची पश्चिम बाजु, सुकेणे रस्ता ओलांडुन पुढे दक्षिणेला गट नंबर ८३० पुढे बाणगंगा नदीच्या पात्राचे उत्तर बांधाने पुढे दक्षिणेकडील भाग बाणगंगानगर येथील गट नंबर ३२ ते ३७, ३९ ते ४१, ६८, ६९ चे पुढे पश्चिम हद्दीने दक्षिण बाजुकडे चारी नं. १६ ओलांडुन आग्नेय टोकाकडील ओझर शिवारातील गट नं १६५४ चे पुर्वेकडील बांधापर्यत.

**पश्चिम** :- मौजे जऊळके, ता.दिंडोरी गावाचे शिवेचे पुर्ण हद्दीने गट नंबर २१४९ च्या नैऋत्य टोकापासुन पुढे उत्तरेकडे गट नंबर २१५०, २१५१ चे पश्चिम बांधाने पुढे पश्चिमेकडे घागरा नाल्याच्या पात्राचे दक्षिण बाजु पर्यंत गट नंबर २३२४,२३१३ ते २३२५ चे पुढे दक्षिण बांधाने राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ मुंबई- आग्रा रोड ओलांडुन उत्तरेकडील दिशेने गट नंबर २३२६ चे नैऋत्य टोकापासुन गट नंबर २३२७ ते २३३२ चे पश्चिम बांधाने मौजे जऊळके ता. दिंडोरी चे शिवेकडील पूर्व बाजुने गट नंबर २५०९ मधील मोहाडी पूर्व पश्चिम रस्ता ओलांडुन मौजे जानोरी ता.दिंडोरी गावाचे पुर्ण हद्दीने ओझर ता.निफाड येथील गट नंबर २५१८, २५३० ते २५३२,२५३६,२५३७ पर्यंत जानोरी कडे जाणारा पूर्व – पश्चिम रस्ता ओलांडुन गट नंबर २५३९,२५४१ ते २५४५ चे पश्चिम बांधाने उत्तरेकडे बाणगंगा नदी पात्र ओलांडुन गट नंबर ६०३ व ६०६ पर्यंत उत्तरेकडे पश्चिम बांधाकडील बाजु पर्यंत पुढे जानोरी ओझर पूर्व पश्चिम रस्ता ओलांडुन एच.ए.एल (मिग कारखाना ) गट नंबर २७२९ चे पश्चिम बाजुने जानोरी , ता. दिंडोरी गावाच्या शिवेच्या पूर्व बाजुने वायव्य कोपऱ्यातील एच.ए.एल (मिग कारखाना) गट नंबर २७२९ पर्यंत.

**दक्षिण** :- ओझर , ता. निफाड येथील गट नंबर १६५४ च्या आग्नेय टोकापासुन नारायणगाव (खेरवाडी) गावाच्या शिवेच्या व चारी नं. १९ च्या उत्तर बाजुने गट नं. १६५३, १६५२, १६५१, १६५०, १६४८, १६४७, १६४६, १६४५, १६४३, १६४२, १६४१, १६४०, १६३६, १६५५ ते १६५९, १६३१ ते १६३३, १६६५, १६७१, १६७५ ते १६८३, १६८५, १६८७, १६८८, १६९७ ते १६९९, १७१९, १७२१ ते १७२४, १७३१, १७४५ ते १७४७, १७६१, १७६२ चे पश्चिम दिशेने सायखेडा उत्तर दक्षिण रस्ता ओलांडुन पुढे गट नं १७८७, १७९१ ते १७९३, १८०४ ते १८०६ चे दक्षिण बाजुचे पूर्व पश्चिम बांधाने गंगापुर डावा कालवा ओलांडुन पुढे पश्चिम दिशेने गट नं १८५६ ते १८६५ पर्यंत पिंप्री ओझर रस्ता ओलांडुन गट नं २०२३, २०२६, २०२९, २०३०, २०३९ ते २०४२, २०६३, २०६६,२०६७, २०६९ , २०७८, २०७९, २१२१ ते २१२३, २१२९ ते २१३१, २१३३ ते २१३५, २१३७ ते २१४१, २१४५, २१४६, २१४८ चे दक्षिण बाजुकडील पूर्व पश्चिम बांधाने नैऋत्य कोपऱ्यातील गट नंबर २१४९ पर्यंत.

**उत्तर** :- ओझर ता. निफाड येथील एच.ए.एल (मिग कारखाना ) गट नंबर २७२९ चे वायव्य टोकापासुन सरळ ओझर मोहाडी शिवेकडील पूर्व-पश्चिम बांधाने दक्षिणेकडील भाग पुढे गट नंबर ६५९ ते ६६३, ६६७, ६६९, ६९३ ते ६९७ पर्यंत पूर्व पश्चिम बांधाने दक्षिणेकडील बाजु पुढे दक्षिण नाला ओलांडुन गट नंबर ७०३ च्या ईशान्य टोकापर्यंत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कैलास बधान,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032
dated the 18th February 2021

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MUM-2013/C.R.47/UD-17.— Whereas, by the Government Proclamation, Urban Development Department, No. MUM-2013/ C.R.47/UD-17, published in the *Maharashtra Government Gazette*, Part-I-A, Extraordinary, Central Division Supplement, dated the 4th December, 2020, issued in pursuance of the provisions of sub-section (*3*) of section 3 of the Maharashtra Municipal Councils, Nagar *Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra has invited objections to its proposal to issue a notification under sub-sections (*2*), (*2A*) and (*3*) of section 3 of the said Act, to specify the local area of Ozar *Gram Panchayat* in Nashik District, being a smaller urban area and to constitute a Municipal Council by the name of "the Ozar Municipal Council" for the said smaller urban area;

And whereas, the objections and suggestions so received by the Collector Nashik District, pursuant to the said Proclamation have been duly considered by the Government of Maharashtra;

And whereas, having regard to the factors mentioned in clause (*2*) of article 243-Q of the Constitution of India, the Government of Maharashtra considers it expedient to specify the said local area, more particularly described in Schedule 'A' appended hereto, to be a smaller urban area;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*2*), (*2A*) and (*3*) of section 3 of the said Act, and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby specifies the said local area to be a smaller urban area for which there shall be constituted a Municipal Council as provided in sub-sections (*2*), (*2A*) and (*3*) of section 3 of the said Act, by the name of "the Ozar Municipal Council". The boundaries of the said smaller urban area shall be such as are specified in Schedule 'B' appended hereto.

### Schedule " A"

### Description of the area to be specified as a smaller urban area

Entire revenue village of Ozar having Gaothan and Gat No. 1 to 2731 & entire Banganganagar village & including boundry Gat No.1 to 176.

**East** : Eastern boundary of village Ozar and village Banganganagar.

**West** : Western boundary of village Ozar.

**South** : Southern boundary of village Ozar, Amrutnagar and Vijaynagar.

**North** : Northern boundary of village Ozar.

### Schedule "B"

Boundaries of the local area to be specified as a smaller urban area

**East :** Corner of S No. 703 North-east end in Ozar Tal- Niphad, Dist. Nasik to the downward south direction Gat No.702, 708, 709, 733 to 737 till the side of north-

south to west side beyond Mumbai High way & Palkhed canal Gat No. 742 – fast boundaries HAL civil colonies wall east side to south direction Mouje-Dikshi boundry to west crossing Gangapur canal Gat No. 743, 750 to 756, 768 to 774, 805 to 808, 814 to 817, 820 to 829. Upto north south shiv / beaten path of west side. Beyond sukene road to south Gat No. 830, Banganga river bed north side to south side verge of shiv Banganganagar area Gat No. 32 to 37, 39 to 41, 68, 69 forward west boundry side canal No. 16 beyond to south east Ojhar (Shivar) area Gat No. 1654 east verge.

**West** : The corner of West South of Ojhar Gat No. 2149 and East side of Mauje Jaulke Tal. Dindori shive to north Gat No.2150, 2151 of west verge (बांध) to side of west Ghagra nala bed (पात्र) till south side Gat No. 2334, 2313 to 2325. continued south verge to National highway No.3 Mumbai-Agra Road crossing to north side Gat No.2326 south east end from to Gat No. 2327 to 2332 of west verge and Gat No.2332 alongside Nala crossing to Gat No.2311 to 2513, 2516, 2517 of west verge Mauje Jaulke Tal. Dindori village gate the side of east Gat No. 2509 inside Mohadi east, West crossing Mauje Janori Tal- Dindori village east Boundry to Ozar Tal- Niphad Gat No. 2518, 2530 to 2532, 2536, 2537 way to East-West road Janori crossing Gat No. 2539, 2541 to 2545 west verge to North Banganga river bed crossing Gat No. 603 & 606 till the side north to west verge of continued Janori Ozar East- West road crossing HAL-Mig factory Gat No. 2729 west side Janori Tal- Dindori village verge of east side north east corner HAL- (Mig factory) Gat No. 2729 till.

**South** : Ozar Tal. Niphad Gat No. 1654 of south east end from to Narayangaon (Kherwadi) village verge and canal No. 19 north side Gat No. 1653, 1652, 1651, 1650, 1648, 1647, 1645, 1643, 1642, 1641, 1636, 1655 to 1659, 1631 to 1633, 1665, 1671, 1675 to 1683, 1685, 1687, 1688, 1697 to 1699, 1719, 1721 to 1724, 1731, 1745 to 1747, 1761 to 1762. Till Gat No. 1762 west side to Saikheda north south road crossing continue Gat No. 1787, 1791 to 1793, 1804 to 1806 of south side east, west verge upto Gangapur left canal crossing continued west direction Gat No. 1856 to 1865 till, Pimpri Ozar road crossing to Gat No. 2023, 2026, 2029, 2030, 2039 to 2042, 2063, 2066, 2067, 2069, 2079, 2078, 2121 to 2123, 2129 to 2131, 2133 to 2135, 2137 to 2141, 2145, 2146, 2148 of south side East- West verge of south east corner Gat No. 2149 till.

**North :** Ozar Tal. Niphad – HAL (Mig factory) Gat No. 2729 of north west end to Ozar Mohadi verge. East-West verge of south section continued to Ozar Sakore village end – verge of south section to continued Gat No. 659 to 663, 668, 669, 693 to 697 till east west verge of south side south canal crossing Gat No. 703 north east end.

By order and in the name of Governor of Maharashtra,

KAILAS BADHAN,
Deputy Secretary to Government.

## नगरविकास विभाग

चौथा मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ फेब्रुवारी २०२१

### आदेश

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक- एमयुएम-२०१३/प्र.क्र.४७/नवि-१७.— ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषद, *नगरपंचायती* व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४०) च्या कलम ३ चे पोट-कलम (२), (२क) आणि (३) यांच्या तरतुदीनुसार व त्यातील शक्तींचा वापर करून, शासन अधिसूचना, नगरविकास विभाग, क्र. एमयुएम २०१३/ प्र.क्र. ४७/ नवि -१७, दि. ०४ डिसेंबर, २०२० प्रसिद्ध केली असून, शासनाने नाशिक जिल्ह्यातील ओझर या ग्रामपंचायतीचे स्थानिक क्षेत्र नागरी क्षेत्रामध्ये लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करण्याच्या आणि उक्त स्थानिक क्षेत्रासाठी “ओझर नगरपरिषद” या नावाने नगरपरिषद गठित करण्याचा हेतू घोषित केला होता;

आणि ज्याअर्थी, नव्याने गठित ओझर नगरपरिषदेशी संबंधित सर्व अधिकार व कर्तव्ये पार पाडण्यासाठी शासकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करणे इष्ट वाटते;

आता, त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) याच्या कलम ३४० च्या पोट-कलम (२) मधील परंतुक (इ) परिच्छेद (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, तहसिलदार निफाड, जि. नाशिक यांची ओझर नगरपरिषद या नव्याने गठित केलेल्या नगरपरिषदेची उक्त अधिनियमांन्वये यथोचित रचना होईपर्यंत तहसिलदार, निफाड, जि. नाशिक यांची ओझर नगरपरिषदेशी संबंधित सर्व अधिकार व कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रशासक म्हणून नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कैलास बधान,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400032
dated the 18th February 2021

### Order

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MUM-2013/C.R.47/UD-17.— Whereas, by the Government Notification, Urban Development Department, No. MUM.2013/C.R.47/UD-17, dated the 4th December 2020, issued in exercise of the powers conferred by sub-sections (*2*), (*2A*) and (*3*) of section 3 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra has specified the local area of Ozar Gram Panchayat in Nashik District, being a smaller urban area and to constitute a Municipal Council by the name of "the Ozar Municipal Council" for the said smaller urban area;

And whereas, it is expedient to appoint a Government Officer to exercise all powers and duties of the newly constituted Ozar Municipal Council till the said Municipal Council is duly constituted;

Now, therefore, in exercise of the powers conferred by paragraph ( *i* ) of clause (*e*) of sub-section (*2*) of section 340 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby appoints the Tahasildar, Niphad, District Nashik, as an Administrator of the said newly constituted Ozar Municipal Council to exercise all the powers and duties relating to the said Municipal Council till the said Municipal Council is duly constituted in accordance with the provisions of the said Act.

By order and in the name of Governor of Maharashtra,

KAILAS BADHAN,
Deputy Secretary to Government.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक १८ फेब्रुवारी २०२१

## अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक. झेडपीबी. २०२०/ प्र.क्र.२१/(१)/पं.रा.५.— महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा. अधिनियम-पाच) यांचे कलम ४ चे पोट-कलम (१) यासह २५४ चे पोट-कलम (१) चा खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद विनिर्दिष्ट केलेल्या भूमापन क्रमांक समाविष्ट असलेली स्थानिक क्षेत्रे स्तंभ (६) मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून नाशिक जिल्ह्यातून वगळीत आहे.

## अनुसूची

| अ.क्र.<br>(१) | जिल्हा<br>(२) | गट<br>(३) | निवडणूक विभाग<br>(४) | स्थानिक क्षेत्र<br>(५) | वगळण्याचा दिनांक<br>(६) |
|---|---|---|---|---|---|
| १. | नाशिक | ओझर | ओझर | ओझर गावठाणातील संपूर्ण महसुली क्षेत्र गट नं. १ ते २७३१ आणि संपूर्ण बाणगंगानगर गाव गट क्र. १ ते १७६ च्या सीमेसह.<br>पूर्व :- ओझर गावाची व बाणगंगानगर गावाची पूर्वेकडील सीमा.<br>पश्चिम :- ओझर गावाची दक्षिणेकडील सीमा.<br>दक्षिण :- ओझर, अमृतनगर व विजयनगर गावांची दक्षिणेकडील सीमा.<br>उत्तर :- ओझर गावाची उत्तरेकडील सीमा. | १८ फेब्रुवारी २०२१ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**लहुराज माळी** ( भा.प्र.से. )
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mumbai 400 001,
dated the 18th February 2021.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPB-2020/CR-21/(1)/PR 5.— In exercise of the powers conferred by clause *(a)* of sub-section *(1)* of section 254 read with sub-section *(1)* of section 4 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby excludes from the Nashik District, the local areas specified in column (5) of the Schedule appended hereto, with effect from the date mentioned in column (6) thereof.

*Schedule*

| Sr. No. (1) | District. (2) | Block. (3) | Electoral Division (4) | Local areas. (5) | Date of exclusion. (6) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Nashik | Ozar | Ozar | Entire revenue village of Ozar having Gaothan and Gat No. 1 to 2731 and entire Banganga Nagar village and including boundary Gat no. 1 to 176.<br>East:- Eastern boundary of village Ozar and village Banganga Nagar.<br>West:- Western boundary of village Ozar.<br>South:- Southern boundary of village Ozar, Amrutnagar and Vijaynagar.<br>North:- Northern boundary of village Ozar. | 18th February, 2021. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

LAHURAJ MALI, ( I.A.S.)
Deputy Secretary to Government.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक १८ फेब्रुवारी २०२१

## अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक. झेडपीबी. २०२०/ प्र.क्र.२१ /(२)/पं.रां.५.— महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा. अधिनियम-पाच) यांचे कलम ५ यासह २५६ चे पोट-कलम (१) चा खंड (ख) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद विनिर्दिष्ट केलेल्या भूमापन क्रमांकाचा समावेश असलेले स्थानिक क्षेत्रे स्तंभ क्रमांक (६) मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक १८ फेब्रुवारी २०२१ पासून नाशिक जिल्ह्याच्या ओझर गटातून वगळीत आहे आणि त्या प्रयोजनार्थ शासकीय अधिसूचना, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक पीएसई १०९६/प्र.क्र.११४/०५, दिनांक १९ सप्टेंबर १९९६ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.

उक्त अधिसूचनेच्या अनुसूचीमध्ये, नाशिक जिल्ह्याशी संबंधित नोंद ५ मध्ये निफाड तालुक्याशी संबंधित स्तंभ (३) मधील नोंदीसमोर स्तंभ (४) मध्ये " ओझर गट " या शब्दाऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल.

" ओझर गट खालील स्तंभ (५) मध्ये नमूद केलेले स्थानिक क्षेत्र वगळून ".

## अनुसूची

| अ.क्र.<br>(१) | जिल्हा<br>(२) | गट<br>(३) | निर्वाचक गण<br>(४) | स्थानिक क्षेत्र/तालुका<br>(५) | वगळण्याचा दिनांक<br>(६) |
|---|---|---|---|---|---|
| १. | नाशिक | ओझर | ओझर | ओझर गावठाणातील संपूर्ण महसूली क्षेत्र<br>गट नं. १ ते २७३१ आणि संपूर्ण बाणगंगानगर गाव गट क्र. १ ते १७६ च्या सीमेसह.<br>पूर्व :- ओझर गावाची व बाणगंगानगर गावाची पूर्वेकडील सीमा.<br>पश्चिम :- ओझर गावाची दक्षिणेकडील सीमा.<br>दक्षिण :- ओझर, अमृतनगर व विजयनगर गावांची दक्षिणेकडील सीमा.<br>उत्तर :- ओझर गावाची उत्तरेकडील सीमा. | १८ फेब्रुवारी २०२१. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**लहुराज माळी,** ( भा.प्र.से. )
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mumbai 400 001,
dated the 18th February, 2021.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPB-2020/CR- 21/(2)/ PR 5.— In exercise of the powers conferred by clause *(b)* of sub-section *(1)* of section 256 read with section 5 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby excludes from the Ozar Block of Nashik District, the local areas specified in column (5) of the Schedule appended hereto, with effect from the 18th day of February, 2021; and for that purpose amends the Government Notification, Rural Development and Water Conservation Department, No.PSE-1096/CR-114/05, dated the 19th September, 1996 as follows, namely :—

In the Schedule appended to the said notification, in entry 5 relating to Nashik District, against entry in column (3) relating to Niphad Taluka, in column (4), for the words " Ozar Block" the following shall be substituted, namely :—

"Ozar Block excluding the following local areas specified in column (5)".

*Schedule*

| Sr. No. (1) | District (2) | Block (3) | Electoral College (4) | Local areas (5) | Date of exclusion (6) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Nashik | Ozar | Ozar | Entire revenue village of Ozar having Gaothan and Gat No. 1 to 2731 and entire Banganganagar village and including boundry Gat no. 1 to 176,<br>East:- Eastern boundary of village Ozar and village Banganganagar,<br>West:- Western boundary of village Ozar,<br>South:- Southern boundary of village Ozar, Amrutnagar and Vijaynagar,<br>North:- Northern boundary of village Ozar. | 18th February, 2021. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

LAHURAJ MALI, ( I.A.S.)
Deputy Secretary to Government.

ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक १८ फेब्रुवारी २०२१

**अधिसूचना**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९६१.**

क्रमांक. झेडपीबी. २०२०/ प्र.क्र. २१/(३)/ पं.रा.५. — महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, (सन १९५९ चा महा. अधिनियम-तीन) यांचे कलम ४ चे पोट-कलम (२) चा खंड *(ख)* अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ चा खंड *(ग)* व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार व संविधानाच्या भाग-IX च्या उद्देशार्थ आणि स्थायी समिती जिल्हा परिषद नाशिक, ग्रामपंचायत ओझर, आणि ग्रामसभा ओझर यांच्याशी विचार विनिमय करून महाराष्ट्र शासन याद्वारे, सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेले स्थानिक क्षेत्र त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून गावाचा भाग म्हणून राहणार नाही असे जाहीर करीत आहे.

**अनुसूची**

| अ.क्र. (१) | महसुली गाव. (२) | स्थानिक क्षेत्रे. (३) | गाव म्हणून संपुष्टात आल्याचा दिनांक. (४) |
|---|---|---|---|
| १. | ओझर | ओझर गावठाणातील संपूर्ण महसूली क्षेत्र<br>गट नं. १ ते २७३१ आणि संपूर्ण बाणगंगानगर गाव गट क्र. १ ते १७६ च्या सीमेसह<br>पूर्व :- ओझर गावाची व बाणगंगानगर गावाची पुर्वेकडील सीमा.<br>पश्चिम :- ओझर गावाची दक्षिणेकडील सीमा.<br>दक्षिण :- ओझर, अमृतनगर व विजयनगर गावाची दक्षिणेकडील सीमा.<br>उत्तर :- ओझर गावाची उत्तरेकडील सीमा. | १८ फेब्रुवारी २०२१ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**लहुराज माळी,** ( भा.प्र.से. )
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mumbai 400 001,
dated the 18th February 2021.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT, 1961.

No. ZPB-2020/CR-21/(3)/PR 5.— In exercise of the powers conferred by clause *(b)* of sub-section *(2)* of section 4 of the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959), read with clause *(g)* of article 243 of the Constitution of India, and of all other powers enabling it in that behalf, and in partial modification of all earlier notifications issued in this behalf, and after consultation with the Standing Committee of the Nashik *Zilla Parishad, Village Panchayat* and *Gram Sabha* Ozar in Nashik District, the Government of Maharashtra, hereby declares that the local areas specified in column *(3)* of the Schedule appended hereto, comprising the revenue village Ozar as specified in column *(2)* thereof, shall cease to be the village, for the purpose of Part IX of the Constitution, with effect from the date shown in column (4) thereof.

*Schedule*

| Sr. No. (1) | Revenue Village. (2) | Local areas. (3) | Date of cessation. (4) |
|---|---|---|---|
| 1. | Ozar | Entire revenue village of Ozar having Gaothan and Gat No. 1 to 2731 and entire Banganganagar village and including boundry Gat no. 1 to 176.<br>East:- Eastern boundary of village Ozar and village Banganganagar.<br>West:- Western boundary of village Ozar.<br>South:- Southern boundary of village Ozar, Amrutnagar and Vijaynagar.<br>North:- Northern boundary of village Ozar. | 18th February 2021. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

LAHURAJ MALI, ( I.A.S.)
Deputy Secretary to Government.

ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक १८ फेब्रुवारी २०२१

**आदेश**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक. झेडपीबी. २०२०/ प्र.क्र.२१ /(४)/पं.रा.५.– ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा. अधिनियम ५) याच्या कलम ४ चे पोट-कलम (१) यासह कलम २५४ च्या पोट-कलम (१) चा खंड (क) यान्वये महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीबी २०२०/ प्र.क्र.२१ /पं.रा.५, दिनांक १८ फेब्रुवारी २०२१, याद्वारे नाशिक जिल्हा परिषदेच्या परिषद सदस्यांच्या पदावधीमध्ये, नाशिक जिल्ह्याच्या सीमांमधून, इतर गोष्टींबरोबरच यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये नमूद केलेल्या निवडणूक विभागाचा समावेश असलेल्या स्थानिक क्षेत्रांना त्यांमधून वगळून ( यात यानंतर ज्याचा निर्देश " वगळलेले क्षेत्र " असा करण्यात आला आहे) त्या सीमांमध्ये फेरफार केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, हे वगळलेले क्षेत्र आता, ओझर नगरपरिषद क्षेत्रात समाविष्ट करण्यात आले असून त्या क्षेत्राचा भाग बनलेला आहे;

- आणि ज्याअर्थी, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद केलेला नाशिक जिल्हा परिषदेचा परिषद सदस्य हा, उक्त जिल्हा परिषदेच्या, या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये नमूद केलेल्या, वगळलेल्या क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करतो, असे महाराष्ट्र शासनाचे मत आहे;

त्याअर्थी, आता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा. ५) याच्या कलम २५५ च्या पोट-कलम (२) चा खंड (ख) चा उप खंड (दोन) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून तसेच नाशिक जिल्हा परिषदेच्या संबंधित सदस्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, महाराष्ट्र शासन याद्वारे, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद केलेल्या, नाशिक जिल्हा परिषदेच्या सदस्यास १८ फेब्रुवारी २०२१ या दिनांकापासून पदावरून दूर करीत आहे.

**अनुसूची**

| अ.क्र. (१) | जिल्हा (२) | गट (३) | निवडणूक विभाग (४) | जिल्हा परिषद सदस्याचे नाव (५) |
|---|---|---|---|---|
| १. | नाशिक | ओझर | ओझर | श्री. यतिन रावसाहेब कदम |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**लहुराज माळी,** ( भा.प्र.से. )
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mumbai 400 001
dated the 18th February 2021

## Order

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPB-2020/CR-21/(4)/PR 5.— Whereas, by Government Notification, Rural Development Department No. ZPB-2020/CR-21/PR 5, dated the 18th February 2021, issued under clause (a) of sub-section (*1*) of section 254 read with sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah.V of 1962), the Government of Maharashtra during the term of the Councilor of the Nashik *Zilla Parishad* altered the boundaries of the Nashik District by excluding, *inter alia*, therefrom the local areas comprising the electoral Division mentioned in column (4) of the Schedule appended hereto (hereinafter referred to as "the excluded area") ;

And whereas, the excluded area have now been included in, and forms part of, the Municipal Council area of the Ozar *Municipal Council ;*

And whereas, the Governemnt of Maharashtra is of the opinion that the Councilor of the Nashik *Zilla Parishad* mentioned in column (5) of the said Schedule, represents the excluded area mentioned in column (4) of the said *Zilla Parishad* ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-clause (*ii*) of clause (*b*) sub-section (*2*) of section 255 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961(Mah. V of 1962), and after giving, to the concerned councilor of Nashik *Zilla Parishad*, the reasonable opportunity of being heard and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby removes with effect from the 18th day of February, 2021 the Councilor of the Nashik *Zilla Parishad* mentioned in column (5) of the said Schedule.

*Schedule*

| Sr.No. (1) | District (2) | Block (3) | Electroral Division (4) | Name of the Zilla Parishad Councilor (5) |
|---|---|---|---|---|
| 1 | Nashik | Ozar | Ozar | Shri Yatin Raosaheb Kadam |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

LAHURAJ MALI, ( I.A.S.)
Deputy Secretary to Government.

ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक १८ फेब्रुवारी २०२१

**आदेश**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक : झेडपीबी २०२०/ प्र.क्र.२१ /(५)/पं.रा.५ .¬ ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा. अधिनियम ५) याचे कलम ५ सह, कलम २५६ च्या पोट-कलम (१) चा खंड (ख) यान्वये महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक झेडपीबी २०२०/ प्र.क्र. २१ /पं.रा.५, दिनांक १८ फेब्रुवारी २०२१ याद्वारे नाशिक जिल्हा परिषदेच्या ओझर पंचायत समितीच्या सदस्यांच्या पदावधीमध्ये ओझर गटाच्या सीमांमधून, इतर गोष्टींबरोबरच, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद केलेल्या निर्वाचक गणाचा ( इलेक्ट्रोल कॉलेजचा ) समावेश असलेल्या स्थानिक क्षेत्रांना त्यांमधून वगळून ( यात यानंतर ज्याचा निर्देश " वगळलेले क्षेत्र " असा करण्यात आला आहे.) त्या सीमांमध्ये फेरफार केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, हे वगळलेले क्षेत्र आता ओझर नगरपरिषद क्षेत्रात समाविष्ट करण्यात आले असून त्या क्षेत्राचा भाग बनलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद केलेले ओझर या पंचायत समितीचे सदस्य या, उक्त पंचायत समितीच्या, या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये नमूद केलेल्या, वगळलेल्या क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करतात, असे महाराष्ट्र शासनाचे मत आहे ;

त्याअर्थी, आता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा. ५) याच्या कलम २५७ च्या पोट-कलम (दोन) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून तसेच ओझर पंचायत समितीच्या संबंधित सदस्यांस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, महाराष्ट्र शासन याद्वारे, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (६) मध्ये नमूद केलेल्या ओझर पंचायत समितीच्या सदस्यास १८ फेब्रुवारी २०२१ या दिनांकापासून पदावरून दूर करीत आहे.

**अनुसूची**

| अ.क्र. (१) | जिल्हा (२) | गट (३) | निर्वाचक गण (४) | पंचायत समिती सदस्यांचे नाव (५) |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ओझर | ओझर टाऊनशिप | श्री. नितीन प्रभाकर जाधव. |
| २ | | | ओझर | श्री. नितीन सिताराम पवार. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**लहुराज माळी,** ( भा.प्र.से. )
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mumbai 400 001,
dated the 18th February 2021

### Order

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPB-2020/CR-21/(5)/PR 5.— Whereas, by Government Notification, Rural Development Department No.ZPB-2020/CR-21/PR 5, dated the 18th February 2021, issued under clause (*b*) of sub-section (*1*) of section 256 read with section 5 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah.V of 1962), the Government of Maharashtra during the term of Office of the members of the Ozar *Panchayat Samiti* of the Nashik *Zilla Parishad*, altered the boundaries of the Ozar Block by excluding, *inter alia,* therefrom the local areas comprising the electoral colleges mentioned in column (5) of the Schedule appended hereto (hereinafter referred to as "the excluded area" );

And whereas, the excluded area has now been included in, and forms part of, the Municipal Council area of the Ozar *Municipal Council* ;

And whereas, the Governemnt of Maharashtra is of the opinion that the members of the Ozar *Panchayat Samiti* mentioned in column (6) of the said Schedule, represents the excluded area mentioned in column (5) of the said *Panchayat Samiti* ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*ii*) of section 257 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961(Mah. V of 1962), and after giving to the concerned member of Ozar *Panchayat samiti*, the reasonable oppourtunity of being heard and all other power enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby removes, with effect from the 18th day of February 2021, the members of the Ozar *Panchayat Samiti* mentioned in column (6) of the said Schedule.

*Schedule*

| Sr. No. (1) | District (2) | Block (3) | Electroral Divisions (4) | Electroral Colleges (5) | Name of the *Panchayat Samiti* members (6) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Nashik | Ozar | Ozar | Ozar Township | Shri. Nitin Prabhakar Jadhav. |
| 2 | | | | Ozar | Shri. Nitin Sitaram Pawar. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

LAHURAJ MALI, ( I.A.S.)
Deputy Secretary to Government.

ग्राम विकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक १८ फेब्रुवारी २०२१

**आदेश**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीबी. २०२०/प्र.क्र.२१/पं.रां.५.-- ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) याच्या कलम ३ चे पोट-कलम (२), (२क) आणि (३) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना नगरविकास विभाग क्र. एमयुएम २०१३/प्र.क्र.४७/नवि १७, दिनांक ४ डिसेंबर २०२० ( यात यापुढे जिचा " उक्त अधिसूचना " असा निर्देश करण्यात आला आहे) अन्वये महाराष्ट्र शासनाने नाशिक जिल्ह्यातील ओझर महसुली गावाचे स्थानिक क्षेत्र हे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट केले आहे आणि त्या करीता उक्त अधिनियमाच्या कलम ३ चे पोट-कलम (२), (२क) आणि (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ओझर *नगरपरिषद* या नावाने *नगरपरिषद* गठित करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेस अनुसरून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा पाच) याच्या कलम २५५ च्या पोट-कलम (२) चा खंड (सहा) अन्वये विद्यमान स्थानिक प्राधिकरणाची मत्ता, हक्क आणि दायित्वे (त्याने केलेला कोणताही करार किंवा संविदा या खालील हक्क व दायित्वे धरून ) उत्तराधिकारी स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याचा आदेश देणे इष्ट आहे;

त्याअर्थी, आता , महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम २५५ च्या पोट-कलम (२) चा खंड (सहा) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, असा निदेश देते की, नाशिक जिल्ह्यातील ओझर महसुली गावासंबधात नाशिक जिल्हा परिषदेच्या सर्व मत्ता, हक्क आणि दायित्वे (तिने केलेला कोणताही करार किंवा संविदा या खालील हक्क व दायीत्वे धरून ) ही, शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक एमपीएच. १९९७ / सीआर-६४५/५६(४७), दिनांक २० जुलै १९९९ या मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीवर ओझर नगरपरिषदेकडे हस्तांतरित झाल्याप्रमाणे असतील आणि तिच्याकडे निहित असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**लहुराज माळी** ( भा.प्र.से. ),
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mumbai 400 001,
dated the 18th February 2021

## Order

MAHARASHTRA ZILLA PARISHAD AND PANCHAYAT SAMITI ACT, 1961.

No. ZPB-2020/CR-21/PR 5.—Whereas, the Government of Maharashtra, under the Notification, Urban Development Department, No.MUM-2013/C.R.47/UD-17, dated 4th December, 2020 hereinafter referred to as " the said Notification ") issued in exercise of the powers conferred by sub-sections *(2), (2A)* and *(3)* of Section 3 of Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) has specified the local area of revenue village of Ozar in Nashik District to be a transitional area, for which a *Municipal Council* as provided in sub-sections (*2*), (*2A*) and (*3*) of Section 3 of the said Act , by the name of the Ozar *Muncipal Council,* is constituted;

And whereas, pursuant to the said notification, it is expedient to issue an order for transfer of assets, rights and liabilities of the existing local authority (including the rights and liabilities under any agreement or contract made by it) to the successor local authority under clause *(vi)* of sub-section *(2)* of section 255 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962);

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause *(vi)* of sub-section *(2)* of section 255 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 ( Mah V of 1962 ), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby directs that all the assets, rights and liabilities of the Nashik *Zilla Parishad,* (including the rights and liabilities under any agreement or contract made by it) in respect of the revenue village Ozar in Nashik District shall stands transferred to and shall vest in the *Nagar Parishad of Ozar Muncipal Council* on the terms and conditions specified in the Government Resolution, Rural Development and Water Conservation Department, No. MPH-1997/CR-645/56(47), dated the 20th July 1999.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

LAHURAJ MALI ( I.A.S.),
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.